जा.क्र.कृ.आ/विप्र-२/गति.कड/मा.सु/रब्बी-१२/प्र.क्र.१०/५२८/१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,
पुणे-४११००५ दि.७/९/२०१२.

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक,**

**...............................**

**विषय- गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) रब्बी हंगाम सन २०१२-१३ मार्गदर्शक सुचना.**

**<u>सदर कार्यक्रम राबविताना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.</u>**

सोबत प्रपत्र १ मध्ये जिल्हानिहाय, हरभरा पिकाचे राबवावयाचे ५०० हेक्टर क्षेत्राच्या प्रकल्पांची संख्या दिली आहे. **हरभरा पीकाची उत्पादकता कमी असलेल्या तालुक्याची निवड करण्यात यावी व तालुक्यातील कमी उत्पादकता असलेल्या गावामध्ये सदर प्रकल्प राबविण्यात यावेत. यापुर्वी ज्या गावात गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) प्रात्यक्षिके घेण्यात आली ती गावे परत निवडण्यात येऊ नयेत. निवडलेल्या तालुक्यांची व गावांची गटनिहाय माहिती कृषि आयुक्तालयास २० सप्टेंबर २०१२ पर्यत सादर करावी.**

गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम सन २०१२-१३ मध्ये राबविताना ५०० हे.च्या लघुप्रकल्पामध्ये राबविणे बंधनकारक आहे. खालील बाबींचे पायाभुत सर्वेक्षण करुन या प्रकल्पाचे उद्दीष्ट काय रहाणार आहे व त्यावरुन जो परीणाम अपेक्षित आहे याची नीट मांडणी करुन प्रकल्प तयार करण्यात यावेत.

अ) निवडलेल्या क्षेत्रातील पीकनिहाय क्षेत्र, पीक पध्दती

ब) पीकनिहाय वाणाखालील क्षेत्र व वाण निहाय उत्पादकता.

क) जमिन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश व सुक्ष्ममुलद्रव्ये.

ड) उपलब्ध सिंचन सुविधा त्यातील सिंचना खालील क्षेत्र व कडधान्य पिकासाठी उपलब्ध हाणारे सिंचन.

इ) उपलब्ध ट्रॅक्टर/पॉवर टीलर/बैल जोडी संख्या तसेच औजारे निहाय उपलब्धता.

ई) पीकनिहाय निविष्ठा वापराचे प्रमाण.

फ) उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळ.

ग) निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा तसेच तयार झालेल्या कृषि मालाची पणन व्यवस्था.

प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे ते नमुद करुन प्रगति अहवाल तयार करण्यात यावेत. तसेच त्याची विविध बाबींच्या फोटोसहीत यशोगाथा तयार करण्यात यावी. प्रकल्प आराखडा यशोगाथा, तदअनुषंगित संकिर्ण खर्च व अधिकारी भेटीसाठी प्रती प्रकल्प रु.१६१००/- मंजूर करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कडधान्य योजनेमध्ये १०० हेक्टरचे लघुप्रकल्प करण्यात आले असुन सदर लघुप्रकल्पाअंतर्गत हरभरा पिकासाठी निवडण्यात आलेली लाभार्थी वगळुन हा कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रमामध्ये यापुर्वी लाभ दिलेल्या गावांची निवड करु नये.

http://mahaagri.gov.in/

## कार्यक्रमाची अंमलबजावणी

१. उपविभागीय कृषि अधिकारी हे या कार्यक्रमाचे अंमलबजावणी अधिकारी म्हणून काम करतील.

२. निवडलेल्या प्रकल्पासाठी तालुका कृषि अधिकारी प्रभारी अधिकारी म्हणून काम पाहतील.

३. निवडलेल्या तालुक्यातील गांवे निश्चित करुन कडधान्य पिकांचे उत्पादक शेतकरी निवडण्यात यावेत. निवडलेल्या क्षेत्रातील सर्व हरभरा उत्पादक शेतकरी गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) योजनेच लाभार्थी असतील. या शेतक-याकडुन सोबत दिलेल्या नमुन्यात समंतीपत्र घेण्यात यावे. त्यानंतर गटप्रमुखाचे स्वतंत्र प्रशिक्षण घेण्यात यावे. त्यासाठी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांना बोलावुन कडधान्य उत्पादनाबाबत सखोल माहिती देण्यात यावी.

४. सर्वसाधारणपणे २० हे.चे गट तयार करुन प्रत्येक २० हे.मागे एक गटप्रमुख म्हणुन एका प्रगतिशील शेतक-याची निवड करण्यात यावी, म्हणजेच एका प्रकल्पामध्ये सर्वसाधारण २५ गट तयार करुन त्याचे प्रत्येकी 1 प्रमाणे २५ गटप्रमुखांची निवड करावी व गट प्रमुखांचे एक दिवसाचे हंगामापुर्व तांत्रीक प्रशिक्षण घेण्यात यावे.

५. सप्टेंबर महिन्याच्या दुस-या आठवडयामध्ये गटातील सर्व शेतक-यांचे एक दिवसाचे प्रशिक्षण घेण्यात यावे. १०० शेतक-यांचे गट करुन प्रशिक्षण देण्यात यावे. १०० शेतक-यांसाठी रु. १००००/- याप्रमाणे ५०० शेतक-यांचे प्रशिक्षणासाठी रु.५००००/- मंजूर करण्यात आले आहेत. प्रशिक्षणासाठी कृषि विद्यापीठांचे कडधान्य विशेषज्ञांना बोलविण्यात यावेत. यामध्ये लागवड पध्दती, पीक संरक्षण, पाणी व्यवस्थापन, हरभरा पीकाचे अर्थशास्त्र इ. बाबीचा समावेश असावा. तसेच एक अे३पी प्रकल्पास प्रशिक्षणसाहीत्यासाठी रु.१००००/- निधी मंजूर केलेला असुन च्यामधुन कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञाकडुन हरभरा पिकाचे लागवड तंत्रज्ञानाची संपूर्ण माहिती तयार करुन (२ ते ३ पानी घडीपत्रीका) शेतक-यांना वाटप करण्यात यावे.

६. प्रपत्र-२ मध्ये प्रकल्पामध्ये राबवावयाचा कार्यक्रम देण्यात आलेला आहे. त्यापैकी पिक प्रात्यक्षिकासाठी देण्यात आलेले निविष्ठा पॅकेज गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) गटातील निवडलेल्या सर्व शेतक-यांना त्याचे प्रकल्पाअंतर्गत हरभरा पिकाचे क्षेत्रानुसार देण्यात यावे. रासायनिक खते, सुक्ष्ममुलद्रव्ये व पीक संरक्षण औषधे याबाबत त्याचे उपलब्धतेनुसार तसेच कीड व रोगांचे प्रार्दुभावानुसार जर बदल करावयाची आवश्यकता असल्यास त्याबाबीसाठी दिलेले अनुदान मर्यादेत राहून कृषि विद्यापीठांचे शिफारशीनुसार बदल करण्यास हरकत नाही. तथापी असे बदल अत्यावश्यक असल्यासच करण्यात यावेत.

**गटांचे बळकटीकरण-**

(प्रपत्र २ मधील अ.क्र.१० ते १८ नुसार एक प्रकल्पामध्ये गटांचे बळकटीकरणाअंतर्गत राबवावयाचा कार्यक्रम दिलेला आहे.)

७. कडधान्य पिकांच्या पेरणीपुर्वी, पेरणीनंतर हंगामाच्या मध्यावधी काळात व पीकाचे काढणी पुर्वी असे तीन गटप्रमुखाचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात यावे. यासाठी प्रति प्रशिक्षण वर्गासाठी रु.३३००/- प्रमाणे तीन प्रशिक्षणाचे रु.९९००/- प्रत्येक प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आले आहेत. गटप्रमुखामार्फत सर्व शेतक-यांना तंत्रज्ञानाची माहिती/संदेश देण्यात यावा.

८. गटप्रमुखाचे भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक घेवुन प्रत्येक आठवडयात एसएमएस व्दारे संदेश देण्यात यावा.

http://mahaagri.gov.in/

९. शेतक-यांकडुन या प्रकल्पाअंतर्गत करावयाच्या कामाची नोंद गट प्रमुखाने ठेवावी. त्यासाठी त्यांना छोटीसी पुस्तिका करुन देण्यात यावी. त्या पुस्तकेत त्या गटप्रमुखाकडील २० शेतक-यांच्या हरभरा पिक उत्पादनासाठी हंगामामध्ये राबविलेल्या सर्व बाबीची इत्यभूत माहिती नोदंविण्यात यावी.

१०. हरभरा उत्पादन वाढीसाठी येणारे अडथळे, हरभरा उत्पादन वाढीतील पिकाचे महत्वाचे टप्पे व त्यासाठी नेमकेपणाने अवलंब करावयाच्या तंत्रज्ञानाबाबत गट प्रमुखांना तसेच सर्व शेतक-यांना जाणीवपुर्वक व वेळेवर माहिती देण्याच्या दृष्टीने कृषि अधिकारी/कृषि पर्यवेक्षक यांनी सनियंत्रण करावे.

११. पीक वाढीचे काळात योग्य तंत्रज्ञानाचा वापर वेळेवर केला किंवा कसे याची माहिती गट प्रमुखानी ठेवावी. कृषि पर्यवेक्षक/कृषि अधिकारी यांनी प्रत्येक आठवडयास सदरील पुस्तिकेतील नोंदी तपासाव्यात. या प्रकल्पात घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिकाचे पीक कापणी प्रयोग कृषि पर्यवेक्षक/कृषि अधिकारी यांनी त्यांचे उपस्थितीत आयोजित करावेत व पीक उत्पादनाची नोंद घ्यावी.

http://mahaagri.gov.in/

**-:संमती_पत्र_:-**

**तालुका कृषि अधिकारी..............** **ठिकाण-**

**दिनांक-**

**व्दारा- मंडळ कृषि अधिकारी.............................**

**विषय- गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रमात (अे३पी) सहभागी होणेबाबत.**

वरिल विषयानुसार ........................तालुक्यातील गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत .............पिकाची निवड झाले बाबत मला गावचे कृषि सहाय्यकामार्फत कळविण्यात आले असुन मी प्रकल्पात सहभागी होवू इच्छितो. मी ...................हे पीक वर्षानुवर्षे घेत असुन माझी............ पीकाची उत्पादकता एकरी..................किलो असुन मी ती उत्पादकता..............साध्य करण्यासाठी कृषि विभागामार्फत मला खालील तंत्रज्ञान सांगितले असुन त्याचा अवलंब मी करण्यास तयार आहे.

१) पेरणीपूर्व मशागत करणे.
२) पेरणीपूर्व शेणखत एकरी ५ बैलगाडया व जिप्सम वापरणे.
३) पेरणीपूर्व शेतात जलसंधारण स-या पाडुन वाफे तयार करणे.
४) पेरणीसाठी २ चाडी पाभरीचा वापर करुन खते देणे.
५) बिजप्रक्रीया करणे.
६) पेरणीनंतर पाण्यासाठी दंड पाडणे.
७) घाटेअळी व मर रोगाचे नियंत्रणासाठी पिक संरक्षक औषधांच्या वापर करणे.
८) या व्यतिरिक्त कृषि विभागाकडून वेळोवेळी दिलेल्या माहितीनुसार आवश्यक त्या तंत्रज्ञान बाबी अवलंबेल.

वरील तंत्रज्ञानासंदर्भात मला खालील निविष्ठा अनुदानावर मिळालेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) बियाणे मिनिकिट- | कि.ग्रॅ. | २) डीअेपी | कि.ग्रॅ. |
| ३) झिंक सल्फेट- | कि.ग्रॅ | ४) रायझोबियमकल्चर- | ग्रॅम |
| ५) पी.एस.बी- | ग्रॅम | ६) ॲझाडिरेक्टिन - | मिली |
| ७) इमेमॅक्टीन बेन्झोएट- | ग्रॅम | ८) इतर | |

वरील निविष्ठांचा वापर मी प्रात्यक्षिकांसाठी करणार आहे. यातील खते, औषधांचा वापर माझे किंवा इतरांचे प्रात्यक्षिकांच्या क्षेत्राव्यतीरिक्त करणार नाही. तसेच वरील सर्व तंत्रज्ञानांचा वापर करणेस तयार आहे. तंत्रज्ञानांचा वापर न करणे किंवा निविष्ठांचा वापर केला नाही तर माझे प्रात्यक्षिकांवर झालेला खर्च रुपये............मी शासनांस परत करण्यास बांधील राहिल. तरी माझी निवड प्रकल्पांत करावी ही विनंती.

**सही-**

**शेतक-यांचे नाव-**

**गांव-**

**संपर्क नंबर-**

http://mahaagri.gov.in/

## प्रकल्पनिहाय राबवावयाचा कार्यक्रम

प्रकल्प निहाय राबवावयाच्या कार्यक्रमाची माहिती प्रपत्र-२ मध्ये दिली आहे. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी गटप्रमुखांच्या सहाय्याने तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी व संबधित गाव ज्यांचे कार्यक्षेत्रात येते ते कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक तसेच निवडलेले शेतकरी गटप्रमुखाचे सहाय्याने राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे. तसेच त्याचे वेळापत्रकही तयार करण्यात यावे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यांचे क्षेत्रीय अधिका-यांशी संपर्क साधुन निविष्ठांचा पुरवठा कोणत्या ठिकाणी करावयाचा आहे याची माहिती दयावी व निविष्ठा पुरवठयाचे नियोजन करण्यात यावी.

## गटांचे बळकटीकरण

**१) प्रशिक्षण-**

यापैकी प्राथमिक प्रशिक्षण व गटप्रमुखांचे प्रशिक्षण बाबत माहिती वरिल परिच्छेद क्र.५ व ७ मध्ये देण्यात आली आहे.

**२) शेतकरी शेतीशाळा धर्तीवर शेतकरी प्रशिक्षण- (मास्टर ट्रेनर यांनी घ्यावयाचे प्रशिक्षण)**

शेतकरी शेतीशाळा रब्बी हंगामामध्ये हरभरा पिकासाठी आयोजन करण्यात याव्यात.

- शेतकरी शेतीशाळा धर्तीवर शेतकरी प्रशिक्षण राबवावयाचे आहेत. याची खालीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी. प्रत्येक प्रकल्पामध्ये एक शेतीशाळा आयोजित करण्यात यावी.
- प्रति शेतीशाळा रु.१७०००/- आर्थिक तरतूद राहील.
- अधिक उत्पादन व उत्पादकता घेणेसाठी शेतक-यांना प्रत्यक्ष शेतावर अद्ययावत माहिती पुरविण्यात यावी.
- कडधान्य पिकांच्या शेतीशाळेमध्ये शेतक-यांना त्यांच्या शेतावर हंगामामध्ये प्रत्येक आठवडयातुन एकदा पिकामध्ये पीक उत्पादन व पिक संरक्षण तंत्राचा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावा.
- कडधान्य पिक प्रात्यक्षिके/पिकांचे क्षेत्र शेतीशाळेसाठी वापरण्यात यावेत.
- एका शेतीशाळेत एकुण १० प्रशिक्षण सत्रे प्रत्येक आठवडयाला व शेवटचे दोन प्रशिक्षण सत्रे १५ दिवसातुन एकदा घेण्यात यावीत.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान जिल्हा स्तरीय समितीने समाविष्ठ असणा-या तालुक्यातील प्रत्येक मंडळासाठी उपलब्ध क्षेत्र व परिस्थीतीनुसार शेतीशाळेचे नियोजन करावे. कृषि विद्यापीठे, केंद्र शासनाच्या संस्था येथील दोन कृषि तज्ञ प्रत्येक शेतीशाळेत असतील. प्रशिक्षणार्थी शेतक-यांची संख्या ३० प्रति शेतीशाळा राहील. प्रत्येक शेतीशाळा तज्ञांच्या सोईच्या वेळेनुसार प्रति दिन ४ ते ५ तासाची असेल.

**शेतीशाळेच्या प्रत्येक प्रशिक्षणाचा बाबनिहाय सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशिल/बाब | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | २ तज्ञांना मानधन रु.७५/- रु.प्रति सत्राप्रमाणे (२० सत्रे) | ३,००० |
| २ | शेतीशाळेसाठी साहित्य, स्टेशनरी व पत्रिका इ. | ४,००० |
| ३ | प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक यांना चहा/अलोपहार रु.१०/- प्रति सत्र प्रति व्यक्ती ३० शेतक-यांकरिता | ६,००० |
| ४ | शेतीदिन व इतर संकीर्ण खर्च | ४,००० |
| | **एकुण खर्च** | **१७,०००** |

http://mahaagri.gov.in/

**३) प्रशिक्षण साहित्य-**

प्रशिक्षण साहित्यासाठी प्रति प्रकल्प रु.१००००/- अनुदान देण्यात येत असुन यामधुन तांत्रिक माहिती/प्रकल्प माहिती इ. च्या माहिती पुस्तिका/घडी पुस्तिका शेतक-यांना देण्यात याव्यात.

**४) प्रशिक्षण सभागृह-**

ज्या ठिकाणी शासकीय गोदाम अथवा साठवणुकीची सुविधा उपलब्ध नाही त्या ठिकाणी शेतकरी प्रशिक्षण तसेच निविष्ठा साठवणुक व वितरणासाठी तीन महिन्याचा कालावधीसाठी भाडेतत्वावर हॉल घेण्यात यावा. यासाठी रु.७५००/- अनुदान मंजूर करण्यात आल आहे.

**५) शेतीदिन-**

शेतीदिन कार्यक्रमासाठी रु.१००००/- अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

प्रात्यक्षिके घेतलेल्या ठिकाणी पीकाच्या वेगवेगळया महत्वाच्य वाढीच्या अवस्थेत कमीत कमी दोन वेळा शेतीदिनाचे आयोजन करण्यात यावेत व शेतक-यांना त्या पिकाच्या उत्पादन वाढीच्या समास्याविषयी मार्गदर्शन करावे. याप्रसंगी गावातील शेतकरी तसेच तालुक्यातील व जिल्हयातील प्रतिष्ठीत व्यक्ती विशेषतः सभापती, आमदार, खासदार, व मा. मंत्रीमहोदयांना आवर्जुन आमंत्रित करावे. आयोजित केलेल्या शेतीदिनाचा तपशिल कृषि पर्यवेक्षकाने स्वतंत्र वहीत नोंद करुन ठेवावी.

**६) प्रसिध्दी फलक-**

**प्रकल्पामध्ये चार महत्वाच्या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे फलक लावण्यात यावा त्यावर खालील माहिती लिहावी.**

**गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) अंतर्गत पीक प्रात्यक्षिक प्रकल्प क्षेत्र-**

- शेतक-यांचे संख्या
- समाविष्ठ गावे
- पीक व वाण
- बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर
- पेरणीची तारीख
- वापरलेली खते
- वापरलेले सूक्ष्ममुलद्रव्ये

यासाठी प्रति प्रकल्प रु.४०००/- निधी ठेवण्यात आलेला आहे.

**७) मुल्यवृध्दी**

उत्पादित मालाला जास्त भाव मिळण्याच्या दृष्टीकोनातुन हि बाब समाविष्ठ करण्यात आली असुन हरभ-याच्या प्रत्येक प्रकल्पामध्ये दालमिल, पॉलिशर व ग्रेडर या उपकरणांचे एक संचासाठी प्रति संच किंमतीच्या ५० टक्के किंवा रु.७००००/- या पैकी जे कमी असेल ते अनुदान मंजुर करण्यात यावे. सदर संच महिला/स्वयंसहायता गटांना ५० टक्के अनुदानावर देण्यात यावे. यामधुन शेतक-यांचे मुल्यवृध्दी व्दारे उत्पन्नात वाढ होईल. तसेच रोजगार निर्मिती होईल अशी संकल्पना आहे. या गटांना पणन व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात यावे जेणेकरुन त्यांच्या मालाला चांगला भाव मिळू शकेल.

**यासाठी संचालक (नि व गु.नि) यांचे व्दारा परिपत्रीत केलेले दर व खरेदी पध्दतीचा अवलंब करावा.**

http://mahaagri.gov.in/

**८) संकीर्ण-**

प्रकल्प आराखडा यशोगाथा, तदअनुषंगित संकिर्ण खर्च व अधिकारी भेटीसाठी प्रती प्रकल्प रु.१६१००/- मंजूर करण्यात आले आहे.

**<u>केंद्र शासनाने सदर कार्यक्रमाच्या नोंदी ठेवण्याबाबत पुढीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.</u>**

१) राष्ट्रीय उत्पादकता परिषदेने प्रात्यक्षिकासाठी विहित केलेल्या प्रपत्रा मध्ये माहिती ठेवावी.

२) मृद परिक्षण अहवाल उपलब्ध करुन ठेवण्यात यावेत.

३) बियाणे व इतर सर्व निविष्ठांची माहिती विहित नमुन्यातील साठा नोंदवहीमध्ये नोदंविण्यात यावी.

४) गट प्रात्यक्षिकाच्या ठिकाणी प्रात्यक्षिकाची माहिती असणारा फलक लावण्यात यावा याबाबतची तपशिलवार माहिती मुद्या क्र.६ मध्ये दिली आहे.

५) पिकाचे वाढीच्या विविध अवस्थामध्ये फोटोग्राफ घेण्यात यावेत व ते जतन करण्यात यावेत.

६) उत्पादन व उत्पादकतेबाबतची माहिती नोंदविण्यात यावी व ती जतन करावी.

**भेट नोंदवही-** भेटी बाबतची स्वंतत्र नोदंवही ठेवुन यामध्ये वरिष्ठ अधिकारी व शास्त्रज्ञ यांनी दिलेल्या सुचनाची नोंद करावी व दिलेल्या भेटीबाबतची स्वाक्षरी घ्यावी.

**लाभार्थी नोंदवही-** लाभार्थी नोंदवहीमध्ये सर्व लाभार्थीची नोंद ठेवून त्यांना दिलेल्या निविष्ठाबाबतची माहिती नमुद करण्यात यावी.

**निविष्ठा तपासणी-** गटास पुरवठा करण्यात आलेल्या निविष्ठा मधुन निविष्ठा निहाय प्रत्येक बॅचचा एक नमुना रॅण्डम पध्दतीने काढावा व तो प्रयोगशाळेतुन तपासुन घ्यावा. नमुना तपासणीचे प्रमाणपत्र साठा रजिस्टर बरोबर जतन करावे.

जर नमुना अप्रमाणित दिसुन आला तर त्या बॅचचे वाटप तात्काळ थांबवावे व तसे कृषि आयुक्तालयास कळवावे.

**सनिंयत्रण-** निविष्ठा पुरवठा तसेच इतर बाबीचे सनिंयत्रण जिल्हा अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समितीव्दारे करण्यात यावे. प्रकल्प व्यवस्थापन समितीने नियमितपणे सनियंत्रण करावे. तसेच वेळोवेळी भेट देणा-या अधिका-यानी याची तपासणी करावी. साठा नोंदवहीमधील नोंदी तपासाव्यात व तसा शेरा मारुन स्वाक्षरी करावी.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात महिन्यातुन किमान एका प्रकल्पास, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ३ प्रकल्पास, उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील ५० टक्के प्रकल्पास व तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व

प्रकल्पास महिन्यातून किमान १ वेळा भेट द्यावी व कामकाजाचा आढावा घेवून भेट नोंदवहीमध्ये नोंद ठेवावी व लाभार्थी यादी, साठा रजिस्टर तपासणी करुन स्वाक्षरी करावी.

**अहवाल-** निविष्ठा पुरवठयाबाबत प्रत्येक आठवडयाच्या शुक्रवारी पुढील पत्त्यावर **tonfsm.pune@agri.maharashtra.gov.in, extn3@rediffmail.com, pesticide@ rediffmail.com, agridext.mah@ nic.in** या ई-मेल व्दारा माहिती देण्यात यावी, तसेच निविष्ठांचा पुरवठा झाल्यानंतर गटनिहाय निविष्ठा पुरवठयाची माहिती कृषि आयुक्तालयास सादर करावी. **तसेच प्रपत्र-१ व २ मध्ये आपले विभाग/जिल्हयाची परिपुर्ण माहिती देण्यात यावी.** याची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन समितीवर राहील. याबाबतचे मासिक अहवाल सादर करण्यात यावेत.

http://mahaagri.gov.in/

क्षेत्रिय अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील अेउपी गटातील शेतक-यांशी नियमित संपर्क ठेवुन वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

प्रकाश सापळयाची मागणी एनसीआयपीएम या संस्थेकडे नोंदविण्यात येत आहे. जिल्हानिहाय पुरवठा करवयाच्या ठिकाणाची माहिती त्यांना देण्यात यावी.

**" रब्बी हंगाम यशस्वी करण्यासाठी आपणांस हार्दिक शुभेच्छा."**

**कृषि संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयक्तालय, महाराष्ट्र राज्य**
**पुणे-४११००५.**

**प्रत-**

**१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ----------------यांना माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव.**

**२. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, प्रभादेवी, मुंबई- ४०००२५.**

**३. मा. व्यवस्थापकीय संचालक, दि. महाराष्ट्र स्टेट को-ऍाप. मार्केटिंग, फेडरेशन लिमिटेड, कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट,मसजिद बंदर, मुंबई - ४०० ००९.**

**४. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.**

http://mahaagri.gov.in/

## प्रपत्र-१

## गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (ॲ३पी)

## रब्बी २०१२-१३ हंगाम जिल्हानिहाय गट तपशिल

| अ.क्र. | जिल्हा/विभाग | गट प्रात्यक्षिकाची संख्या |
|---|---|---|
| १ | नाशिक | ३ |
| २ | धुळे | १ |
| ३ | नंदूरबार | २ |
| ४ | जळगांव | ४ |
| ५ | अहमदनगर | ७ |
| ६ | पुणे | ३ |
| ७ | सोलापूर | ३ |
| ८ | सातारा | २ |
| ९ | सांगली | २ |
| १० | औरंगाबाद | ४ |
| ११ | जालना | २ |
| १२ | बीड | ४ |
| १३ | लातूर | ५ |
| १४ | उस्मानाबाद | ५ |
| १५ | नांदेड | ३ |
| १६ | परभणी | ४ |
| १७ | हिंगोली | ३ |
| १८ | बुलढाणा | ५ |
| १९ | अकोला | ४ |
| २० | वाशिम | ४ |
| २१ | अमरावती | ६ |
| २२ | यवतमाळ | २ |
| २३ | वर्धा | २ |
| २४ | नागपूर | ५ |
| २५ | भंडारा | १ |
| २६ | चंद्रपूर | २ |
| **एकूण महाराष्ट्र** | | **८८** |

## प्रपत्र-२

## गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) रब्बी हंगाम सन २०१२-१३ (पीक- हरभरा)

### निविष्ठा पॅकेज

| अ.क्र. | बाब | परिमाण | मात्रा/हे. | दर (रु. प्रति कि/लि.) | रक्कम (रु./प्रति हे.) | ५०० हे(रु.लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बियाणे | (कि.ग्रॅ.) | ८०.०० | - | - | - |
| | मिनिकिट | (कि.ग्रॅ.) | १६.०० | ८०.०० | १२८०.०० | ६.४०० |
| | शेतकरी | (कि.ग्रॅ.) | ६४.०० | - | - | - |
| २ | डीएपी (५० टक्के अनुदान) | (कि.ग्रॅ.) | १००.०० | २६.३० | १३१५.०० | ६.५७५ |
| ३ | झिंक सल्फेट | (कि.ग्रॅ.) | २०.०० | ४१.०० | ८२०.०० | ४.१०० |
| ४ | रायझोबियम कल्चर | (कि.ग्रॅ.) | २.०० | ३८.०० | ७६.०० | ०.३८० |
| ५ | पी. एस. बी. कल्चर | (कि.ग्रॅ.) | २.०० | ३८.०० | ७६.०० | ०.३८० |
| ६ | थायरम + कार्बेडॅझिम/ट्रायकोडर्मा | (कि.ग्रॅ.) | ०.५० | ४५.०० | २२.५० | ०.११३ |
| ७ | अॅझडिरेक्टिन १५०० पीपीएम | (लि.) | १.०० | १९३.०० | १९३.०० | ०.९६५ |
| ८ | इमॅमेक्टीन बेन्झोएट (५० टक्के अनुदान) | संख्या | ०.१५ | ११२० (१५० ग्रॅम) | ५६०.०० | २.८०० |
| ९ | प्रकाश सापळे | संख्या | २ हेक्टर मध्ये १ | १५००.०० | ७५०.०० | ३.७५० |
| **एकुण निविष्ठा** | | | | | **५०९२.५०** | **२५.४६** |
| १० | प्राथमिक प्रशिक्षण गटातील सर्व शेतक-याचे एक दिवस प्रशिक्षण | | - | - | १ | ०.५०० |
| ११ | गटप्रमुख प्रशिक्षण - २० शेतक-यांच्या गटासाठी--- १ गट प्रमुख गटप्रमुख संख्या-२५ गटप्रमुखाचे एक दिवस तांत्रिक प्रशिक्षण रु.२५००/- तज्ञ प्रशिक्षकांचे मानधन रु.४००/- प्रति तज्ञ, २ तज्ञास | | - | - | २ | ०.०९९ |
| १२ | प्रशिक्षण साहित्य (माहिती पुस्तिका/घडीपत्रीका) | | - | - | - | ०.१०० |
| १३ | शेतकरी शेतीशाळा | | - | - | १ | ०.१७० |
| १४ | प्रशिक्षण सभागृह/निविष्ठा साठवणुक व वितरणासाठी इमारत (३ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर) | | - | - | १ | ०.०७५ |
| १५ | प्रसिध्दी फलक , एकुण फलक संख्या-४ | | - | - | ४ | ०.०४० |
| १६ | व्हॅल्यूअडीशन-(सिंगल रोलर दालमिल,पॉलीशर, ग्रेडर) ५० टक्के अनुदानाने शेतकरी गटासाठी एकुण १ संच | | - | - | १ | ०.७०० |
| १७ | शेतीदिन कार्यक्रम | | - | - | १ | ०.१०० |
| १८ | संकिर्ण (कार्यालयीन खर्च, यशोगाथा, पिकाचे वाढीच्या अवस्थेतील फोटो व इतर) | | - | - | | ०.१६१ |
| **एकुण गटबळकटीकरण** | | | | | | **१.९४५** |
| **एकुण एकंदर** | | | | | | **२७.४०८** |